# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना व प्रशासन विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

email :- gug.registrar@gmail.com    दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४    email:- gondwanaesst@gmail.com


जा.क्र. गो.वि./आस्था./५५२८ /२०२१    दि. ३०/०४/२०२१

## परिपत्रक

विषय :- महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६१ वा वर्धापन दिन समारंभ - दिनांक ०१ मे, २०२१.

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. सीईआर-२०२१/प्र.क्र.३४/३०, दि. २८/०४/२०२१.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६१ वा वर्धापन दिन समारंभ - दिनांक ०१ मे, २०२१ बाबत संदर्भिय शासन निर्णय निर्गमित झाले आहे. त्याअनुषंगाने सर्व संबंधितांनी कार्यवाही घ्यावी.

संलग्नित - संदर्भिय शासन निर्णयाची प्रत.

30/4/2021

**(डॉ. अनिल चिताडे)**
कुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी माहितीस्तव व आवश्यक कार्यवाहीस्तव सविनय सादर:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. प्राचार्य, संलग्नित सर्व महाविद्यालये.
४. सिस्टीम ॲनालिस्ट, संगणक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या कार्यवाहीस्तव.
५. आस्थापना विभाग(नस्ती), गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

30/04/2021

(डॉ. कामाजी देशमुख)
उपकुलसचिव(प्र.)
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६१ वा**
**<u>वर्धापन दिन समारंभ - १ मे, २०२१</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक : सीईआर-२०२१/प्र.क्र.३४/३०**
राजशिष्टाचार शाखा, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख : २८ एप्रिल, २०२१.

**शासन परिपत्रक**

महाराष्ट्र राज्यामध्ये कोरोनाबाधितांची वाढती रुग्ण संख्या विचारात घेवून कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठी (Break The Chain) व सदर विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाने दि.१३ एप्रिल,२०२१ च्या आदेशान्वये **दि.१ मे,२०२१ च्या सकाळी ७.०० वाजेपर्यंत** राज्यात संचारबंदीसह कडक निर्बंध लागू केलेले आहेत. कोरोना विषाणूची साखळी तोडण्यासाठीच्या तरतूदी विचारात घेवून राज्यात महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६१ वा वर्धापन दिन समारंभ गतवर्षी प्रमाणेच, अत्यंत साधेपणाने आयोजित करण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत:-

१) जिल्हा मुख्यालयात केवळ एकाच ठिकाणी सकाळी ८.०० वा. फक्त ध्वजारोहण करण्यात यावे. विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी विभागीय आयुक्त पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती यांनी ध्वजारोहण समारंभाकरीता योग्य ती व्यवस्था करावी. तेथील जिल्हाधिकाऱ्यांनी ध्वजारोहणाचा वेगळा कार्यक्रम आयोजित करु नये. इतर सर्व जिल्हयात केवळ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्यलयाच्या ठिकाणी ध्वजारोहण करण्यात यावे.

२) वरील नमुद ठिकाणी केवळ पालकमंत्री, विभागीय आयुक्त मुख्यालयी समारंभ असल्यास विभागीय आयुक्त, महापौर/नगराध्यक्ष,जिल्हाधिकारी, ज्या ठिकाणी पोलीस आयुक्तालय आहे त्या ठिकाणचे पोलीस आयुक्त, आयुक्त, महानगरपालिका, जिल्हा पोलीस अधिक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद एवढयाच पदाधिकारी/अधिकारी यांनी उपस्थित रहावे. इतर मान्यवरांना आमंत्रित करण्यात येवू नये.

३) कवायती/संचलन आयोजन करण्यात येवू नये.

४) विधीमंडळ, मा.उच्च न्यायालय व इतर संविधानिक कार्यालयांमध्ये कमीत कमी उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात यावे.

५) ध्वजारोहण करणारे पालकमंत्री महोदय काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रमस्थळी उपस्थित राहू न शकल्यास, विभागीय आयुक्त मुख्यालयी विभागीय आयुक्तांनी व जिल्हा मुख्यालयी जिल्हाधिकारी यांनी ध्वजारोहण करावे.

६) आपत्ती व्यवस्थापन विभागाने कोविड-१९ च्या अनुषंगाने दिलेल्या सुरक्षित वावर व इतर सर्व नियमाचे काटेकोर पालन करण्यात यावे.सर्वांसाठी मास्क बंधनकारक राहील, याची दक्षता घेण्यात यावी.